## वार्षिक निकाय सभेचे (जनरल बॉडी मीटिंग) निमंत्रण

चालू ३५ व्या वर्षाची निकाय सभा (जनरल बॉडी मीटिंग) रविवार दि. १९-११-७८ ला (भारतीय सौर कार्तिक २८ शके १९००) सायंकाळी ४ वा. टिळक स्मारक मंदिर, टिळकरोड येथे भरेल. त्या वेळच्या कामकाजाची क्रमणिका खाली दिली आहे. तरी सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

### क्रमणिका

(१) ९-१०-७७ च्या वार्षिक निकाय सभेच्या इतिवृत्तास मान्यता,
(२) पूर्वप्रसिद्ध वृत्तान्ताच्या अनुरोधाने गतवर्षातील कार्याचे निवेदन.
(३) गतवर्षाच्या समाव्ययास (आयव्ययास) मान्यता
(४) १९७८-७९ साठी पदाधिकाऱ्यांची निवड.
(५) १९७८-७९ मध्ये हाती घ्यावयाची कामे.
(६) १९७८-७९ च्या निकल्पावर चर्चा.
(७) आयत्या वेळचे विषय (अध्यक्षांच्या अनुमतीने)
(८) प्राध्यक्षांचे भाषण.
(९) आभार.

पुणे, भारतीय सौर कार्तिक ७ शके १९००
२९ ऑक्टोबर १९७८

आपले
श्री. वि. वि. सोवनी
श्री. अ. वि. धुळे
कार्यवाह

टीप:-सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी कृपया सभेपूर्वी तीन दिवस, कार्यवाह यांचेकडे तसे लेखी कळवावे.

---

### विनंती

परिसंस्थेची सामान्य सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ५ आहे. तरी आपली १९७८-७९ ची वर्गणी, तसेच मागील वर्षाची वर्गणी राहिली असल्यास परिसंस्थेकडे पाठवावी अशी विनंती आहे.

---

"ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम्"

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे

स्थापना १९४४

JYOTIRVIDYA PARISANSTHA POONA2

सन १९७७-७८ शके १८९९-१९०० वर्ष ३४ वे

# वार्षिक वृत्तान्त व समाव्यय

(पुढील वर्षाच्या निकल्पासह)

(वार्षिक निकाय सभेचे निमंत्रण व सभासदांस विनंती यासाठी मलपृष्ठ २ पहावे.)

प्रकाशक
वि. वि. सोवनी,
अ. वि. धुळे
कार्यवाह, ज्यो. प. पुणे

BOOK-POST

कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था,
लो. टिळक स्मारक मंदिर,
टिळक रोड, पुणें.

" ज्ञानस्य निर्मलं नेत्रं ज्योतिष्यकमनुत्तमम् ! "

# ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे

**स्थापना** :–गणेश चतुर्थी शके १८६६ दि. २२–८–१९४४

## सन १९७७–७८ (शके १८९९–१९००) चा
## ३४ व्या वर्षाचा वृत्तान्त

ज्योतिर्विद्या परिसंस्थेने आता ३५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. दि. ३० जून १९७८ ला संपलेल्या ३४ व्या वर्षातील संस्थेच्या कार्याचा हा वार्षिक वृत्तान्त व समाव्यय आपणास सादर करण्यास प्रशासक मंडळास आनंद होत आहे.

## सन १९७७–७८ मधील पदाधिकारी

### प्रशासक मंडळ (Governing Council)

**प्राध्यक्ष** :–प्रि. गो. रा. परांजपे. एम. एस्सी एफ. एन. आय. ओ. बी. ई. (निवृत्त)

**उपाध्यक्ष** :–

(१) डॉ. मो. वा. चिपळूणकर, डी. एस्सी.
(२) प्रा. द. श्री. जोग, एम्. एस्सी.

**नैधिक** :–श्री. य. रा. नेने, एम्. एस्सी.

**कार्यवाह** :–(१) श्री. वि. वि. सोवनी, बी. एस्सी.
(२) श्री. अ. वि. धुळे, डी. एम्. ई. पी. डी. ए. ई.

सदस्य :–( १ ) श्री. वि. धों. गोरेशास्त्री, ज्योतिर्गणिताचार्य व ज्योतिषालंकार.

( २ ) श्री. मो. ना. गोखले, बी. एस्सी.
( ३ ) श्री. स. ग. काजरेकर, बी. एस्सी.
( ४ ) श्री. मा. भ. पंत, बी. एस्सी, बी. टी.
( ५ ) श्री. हे. वा. मोने
( ६ ) श्री. स. चिं. मराठे, बी. ई.
( ७ ) श्री. ग. य. दीक्षित, एम्. ए.
( ८ ) प्रा. अ. त्र्यं. ढवळे, एम्. एस्सी.
( ९ ) प्रा. सू. शां. चौबळ, एम्. एस्सी.
(१०) प्रि. र. ना. बेलवलकर, बी.ई.
(११) प्रा. य. शं. पाटणकर, एम. एससी.

**अंतर्गत अधिक्षक :**–श्री. वा. रा. मराठे, बी. ए.

**समाव्यय अधिक्षक :**–श्री. जी. डी. आपटे आणि कं. चार्टर्ड अकाउंटन्टस्

### तद्विद्य मंडळाचे सभासद (Academic Council)

(१) प्रा. वि. वा. नारळीकर
(२) प्रि. गो. रा. परांजपे
(३) डॉ. मो. वा. चिपळूणकर
(४) प्रा. द. श्री. जोग
(५) श्री. मा. भ. पंत (निमंत्रक)

# वृत्तांतवर्षातील कार्याचे इतिवृत्त

## सभा–बैठकी

### प्रशासक मंडळाच्या सभा

(१) रविवार दि. ७–८–१९७७ रोजी टिळक स्मारक मंदिरातील संस्थेच्या कार्यालयात भरलेल्या सभेत १९७६–७७ वर्षाच्या अहवालाच्या खर्डयास मान्यता देण्यात आली. तसेच १९७७-७८ सालाच्या वार्षिक निकाय सभेच्या कामकाजाच्या दृष्टीने चर्चा झाली. १९७७–७८ या वर्षासाठी निकल्पाचा खर्डा तयार करण्या आला.

(२) प्रशासक मंडळाची दुसरी सभा दि. ५–३–१९७८ रोजी टिळक स्मारक मंदिरातील संस्थेच्या कार्यालयात झाली. तीत संस्थेच्या प्रकाशनांचा खप वाढविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यात येऊन पुढेही त्यासंबंधी काय करता येईल याचा मुख्यतः विचार झाला.

### वार्षिक निकाय सभा

३४ व्या वर्षाची वार्षिक सभा दि. ९–१०–७७ रोजी सायंकाळी ६ वाजता टिळक स्मारक मंदिराच्या तळघरातील सभागृहात भरली होती. सभेस २५ सभासद उपस्थित होते. प्रि. श्री. गो. रा. परांजपे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारल्यावर कामकाजास सुरुवात झाली.

प्रथम संस्थेचे दिवंगत उपाध्यक्ष कै. प्रा. ना. म. आठवले यांना १ मिनिट स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली व शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. त्यानंतर कार्यवाहांनी आधीच्या निकाय सभेचा वृत्तांत वाचला. हा वृत्तांत आणि पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेला गतवर्षाचा कार्यवृत्तांत व समाव्यय सभेने संमत केले. तसेच नव्या वर्षाकरिता संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर सामान्य सदस्यत्वाची वर्गणी वाढवण्याच्या सूचनेवर चर्चा होऊन वर्गणी रु. ३ वरून रु. ५ करावी असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. संस्थेच्या प्रशासक मंडळाचे सदस्य श्री. वि. वि. मोडक यांनी प्रशासक मंडळाचा दिलेला राजीनामा स्वीकारण्यात यावा असे सभेने ठरविले. संस्थेने हाती घ्यावयाच्या दृष्टीने सभेत पुढील सूचना मांडल्या गेल्या व त्यावर सविस्तर चर्चा झाली.

अ) श्री. हेमंत वासुदेव मोने यांनी पुढील महत्त्वाच्या सूचना केल्या.

(१) जास्त किंमतीची मोठी पुस्तके खरेदी करण्याकडे लोकांचा कल नसल्यामुळे खगोलशास्त्रातील महत्त्वाच्या विषयावर परिसंस्थेने छोट्या पुस्तिका प्रसिद्ध कराव्या.

(२) जिज्ञासू विद्यार्थी व नागरिकांसाठी लघुमुदतीचे अभ्यासक्रम आखून वर्ग चालवावेत.

(३) दैनिक ज्योतिःशास्त्राची माहिती असणारी दैनंदिनी छापावी.

(४) अभ्यासमंडळात होणाऱ्या चर्चेचा तपशील सभासदांस पाठवावा. यामुळें हजर नसलेल्या सभासदांना या चर्चांचा लाभ घेता येईल.

ब) डॉ. मल्हारराव वि. आपटे यांनी लिहिलेल्या " पृथ्वीची त्रेधा " या पुस्तकाच्या छपाई खर्चासाठी देणगी मिळवून ते पुस्तक परिसंस्थेने प्रकाशित करावे अशी सूचना डॉ मो. वा. चिपळूणकर यांनी केली.

क) श्री. भानू यांनी असे सांगितले की जाणकार मंडळींनी विद्यार्थ्यांच्या पातळीवर येऊन त्यांना समजेल अशा भाषेत खगोलशास्त्र शिकवावे.

यानंतर प्राध्यक्षांचे भाषण होऊन सभेचे कामकाज संपले.

## अभ्यासमंडळाच्या सभा

अभ्यासमंडळाच्या सभा दर रविवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळात टिळक स्मारक मंदिरातील संस्थेच्या कार्यालयात भरत असत. या सभांना साधारणपणे ८ ते १० सभासद नियमितपणे हजर असत. या सभांमध्ये प्रामुख्याने खालील विषयांवर चर्चा झाली.

(१) चंद्र व पृथ्वीच्या सूर्याभोवतीच्या भ्रमणमार्गाचें वैशिष्टय (२) वर्षाच्या विशिष्ट कालात अधिकमास व क्षयमास कसे होतात. (३) ऑक्टोबर ७८ मधील चंद्रामुळे होणारे रोहिणी ताऱ्याचे पिधान व त्याचा कालावधी (४) ग्रहाची वक्री–मार्गी गती (५) उपग्रहाच्या स्थैर्यासाठी उपग्रह ज्या ग्रहाभोवती भ्रमण करतो त्यापासून आवश्यक असणारे अंतर म्हणजेच रोशे–लिमिट (६) चंद्राचा व चक्रीवादळांचा समुद्र किनाऱ्यावरील भरतीवर व लाटांवर होणारा परिणाम (७) २४ मार्च १९७८ चे चंद्रग्रहण, (८) राहू–केतू, (९) श्री. व्यं. बा. केतकर यांनी १९१२ साली प्लूटोचे अस्तित्व व त्या सालच्या प्लूटोच्या स्थानाचे केलेलें भाकित (१०) कृष्णविवरापासून प्रकाश किरणसुद्धा बाहेर येत नसताना त्यांचे अस्तित्व कसे समजते. (११) उत्तरायण व दक्षिणायन,



## नवसदस्यांचे स्वागत

१९७७–७८ वर्षी पुढील नवीन सभासद झाले.

आजीव सदस्य व त्यांचे पत्ते.

(१) श्री. बाजी अर्जुनवाडकर, १४४३, बाजीराव रोड, " कौस्तुभ, " ब्लॉक नं. १२, शुक्रवार पेठ, पुणे २,

(२) श्री. य. रा. नेने, एम एस्सी, ४२५ नारायण पेठ, पुणे ३०,

(३) सौ. नि. ना. खांबेटे एम्. एस्सी १२१० अ, टिळकवाडी, सदाशिव पेठ, पुणे ३०,

सामान्य सदस्य व त्यांचे पत्ते.

(१) श्री. अ. के. म्हसकर, १२४४, सदाशिव पेठ, पुणे ३०.

(२) श्री. उ. श्री. घोडके, २१०९ 'विकास' विजयानगर वसाहत, सदाशिव पेठ, पुणे ३०.

(३) श्री. म. हि. गुजर, मु. पो. औंध, ता. खटाव, जिल्हा सातारा.

(४) श्री. प्र. व जोशी, १२०६ अ।३१, शिवाजीनगर, पुणे ४,

(५) श्री. अ. पु. साठे, १२९४।अ, सदाशिव पेठ, चिमण्या गणपतीजवळ, पुणे ३०,

(६) श्री. सु. ग. डाके, ४४६, शनिवार पेठ, हसबनीस बखळ, पुणे.

(७) श्री. वि. अ. एकबोटे, ७ अ, ' सुहृद ' सोसायटी, मेहेंदळे गॅरेजसमोर, एरंडवणा, पुणे ४.

(८) श्री. स. दि. केसकर, घ, नं, २९९९, भाजीमार्केटजवळ पंढरपूर, ४१३३०४,

(९) श्री. दि. ल. तेलंग, १००२ अ, घोंगडे गल्ली, पंढरपूर.

(१०) श्री, गो. रा. पोतदार, १३४१, शुक्रवार पेठ, गोवर्धननिवास, पुणे २.

(११) श्री. वि. ग. शुक्ल, एस्. पी. कॉलेज होस्टेल.

## संस्थेच्या ग्रंथसंग्रहालयात पडलेली भर

भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या कलकत्त्याच्या अॅल्मॅनॅक युनिटकडून दर महिन्यास प्रसिद्ध होणारे अॅस्ट्रॉनॉमिकल बुलेटिन संस्थेस मोफत येत असते शिवाय १९७८ सालचे नॉटिकल अॅल्मॅनॅक संस्थेने विकत घेतले.

अॅस्ट्रॉनॉमिकल सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेतर्फे प्रसिद्ध होणारे त्रैमासिक बुलेटिन मार्चपासून संस्थेने विकत घेण्यास सुरुवात केली.

**वृत्तांत वर्षातील कार्याचा आढावा—**

(१) गेल्या वर्षांप्रमाणेच याही वर्षी संस्थेने एप्रिल ७८ पर्यंत दरमहा आकाशस्थ ग्रहगोलांची स्थलकालदर्शक पत्रके प्रसिद्ध केली व ती सभासदांना आणि इतर जिज्ञासू व्यक्तींना पुरविली. या पत्रकांमध्ये सूर्यचंद्रांची स्थाने, चंद्राचा तारकामंडलातील मार्ग, ग्रह कोणत्या वेळी कोठे दिसतील यासंबंधी सविस्तर माहिती, तसेच ग्रहांच्या युत्या, सूर्यचंद्राची ग्रहणे इत्यादि दृश्य ज्योतिषशकीय आविष्कारांची माहिती सोप्या भाषेत दिलेली असे. पत्रके तयार करण्यात परिसंस्थेचे एक सभासद श्री विलास वि. सोवनी यांनी बरेच परिश्रम घेतले.

(ब) यावर्षी संस्थेने खालील ठिकाणी आकाशनिर्दशनाचे कार्यक्रम केले.

(१) दि. १५–१२–७७– डॉ. मो. वा. चिपळूणकर यांच्या घरी (म. ए. सो.च्या गरवारे कॉलेजच्या पदार्थविज्ञान विभागातील अध्यापकासाठी).
(२) दि. १२–१–७८ श्री. के. ग. भानू, कोथरूड,
(३) दि. ९–२–७८ श्री. स. ग. काजरेकर, कर्वे रोड, पुणे ४.
(४) दि ११–२–७८ श्री. जी. व्ही. देशपांडे, कोथरुड यांचे कॉलनीतील रहिवाशासाठी,
(५) दि. १३–३–७८ एल्. आय सी. स्टाफ क्वार्टर्स, गणेशखिंड रस्ता, क्वॉर्टर्समधील रहिवाश्यांसाठी.
(६) दि. १५–३–७८ श्री. एकबोटे, मेहेंदळे, गॅरेजजवळ, कर्वे रोड,
(७) दि. १०–३–७८ श्री. मु. फि. लोखंडवाला, बोहरी आळी,
(८) दि. २२–३–७८ एल्. आय. सी. कॉलनी पौडफाटा,
(९) दि. २४–३–७८ प्रशांतनगर, नवी पेठ, येथे चंद्रग्रहणाच्या निमित्ताने.
(१०) दि. २५–३–७८ पेरुगेट भावेस्कूलचे विद्यार्थ्यांसाठी शाळेचे गच्चीवर
(११) दि. १–४–७८ पुणे विद्यापीठ, रसायनशास्त्र विभाग.
(१२) दि. २–४–७८ श्री. पाटणकर, खजिनाविहिरीजवळ, पुणे ३०.
(१३) दि. ७–४–७८ पर्वतीच्या टेकडीवर पर्वती संस्थानच्या परावर्ती दूरादर्शकाच्या सहाय्याने.
(१४) दि. १७–४–७८ सौ. जावडेकर, कोथरुड.
(१५) दि. ४–५–७८ श्री. वि. वि. सोवनी, प्रशांतनगर, नवी पेठ, पुणे ३०

वेळोवेळी केलेल्या या आकाश निदर्शनाच्या कार्यक्रमासाठी कार्यवाह श्री. वि. वि. सोवनी, श्री. य. रा. नेने, श्री. स. ग. काजरेकर, श्री. य. शं. पाटणकर, श्री. मो. फी. लोखंडवाला यांचे बहुमोल सहाय्य झाले.



(क) संस्थेचे उत्साही कार्यकर्ते श्री. स. ग. काजरेकर, श्री. विलास व श्री. विश्वास सोवनी बंधू व श्री. य. शं. पाटणकर यांनी युरेनसच्या मार्गाचे वेध घेतले.

युरेनस हा ग्रह प्रतियुतीच्या स्थितीत असताना नॉटिकल अॅल्मॅनॅकच्या सहाय्याने त्याचे स्थान निश्चित करून दुर्बिण व द्विनेत्री यांच्या सहाय्याने तो पाहिला. पुढे जवळजवळ दोन महिने (एप्रिल ७८ व मे ७८) त्याच्या गतीचे व मार्गाचे निरीक्षण केले. समाजातील खगोलशास्त्राची आवड असलेल्या जिज्ञासू मंडळीनाही हा ग्रह पाहता यावा म्हणून त्यांना मार्गदर्शन करणारा एक लेख दि. २०–५–७८ च्या दैनिक सकाळमध्ये प्रसिद्ध केला.

(ड) फेब्रुवारी ७८ च्या दुसऱ्या आठवड्यात बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात प्रा. श्री. वसंत द. सहस्रबुद्धे यांनी 'ते चित्तवेधक तारे' या नावाने प्रदर्शन भरविले होते. त्यांत ज्योतिर्विद्या परिसंस्थेनेही आपली काही उपकरणे ठेवली होती. तसेच डॉ. मो वा. चिपळूणकर, श्री. सोवनी बंधु, श्री. य. रा. नेने, श्री. स. ग. काजरेकर इत्यादि कार्यकर्त्यांनी प्रदर्शनास हजर राहून प्रदर्शन पहावयास आलेल्या लोकांचे शंकानिरसन केले व समाजात ज्योतिःशास्त्राची आवड वाढविण्याच्या दृष्टीने या संधीचा फायदा करून घेतला.

(इ) वरील कार्याशिवाय परिसंस्थेच्या कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी व्याख्याने देऊन व विशेष प्रसंगी मासिकांत व वर्तमानपत्रात लेख लिहून ज्योतिशास्त्राच्या ज्ञानप्रसाराचे कार्य चालू ठेवले होते. वैयक्तिक पातळीवरील कार्य असूनसुद्धा ज्याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो असे कार्य म्हणजे परिसंस्थेच्या प्रशासक मंडळाचे एक सदस्य श्री. हे. वा. मोने यांनी आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून 'आकाशदर्शन' ही व्याख्यानमाला आकाशवाणीवर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले व त्याप्रमाणे ऑक्टोबर १९७७ पासून अशी व्याख्यानमाला घडवून आणली. सुरुवातीची कांही व्याख्याने त्यांनी स्वतः दिली. परिसंस्थेच्या पत्रकांच्या आधारे प्रत्येक महिन्याच्या ग्रहस्थितीसंबंधी डॉ. मो. वा. चिपळूणकर यांनी 'सकाळ' मधे लेख प्रसिद्ध केले. परिसंस्थेचे माजी कार्यवाह व सभासद श्री. वि. वि. मोडक यांनी धर्म निर्णय मंडळाच्या पंचांगासाठी बरेच सहाय्य केले.

## Jyotirvidya Parisanstha, Pune.

**Statement of Receipts & Payments for the year ended 30-6-78**

| Receipts | Rs. Ps. | Payments | Rs. Ps. |
|---|---|---|---|
| **Opening balance as on 1-7-77** | | **Salary** | 148-00 |
| Cash on hand | 216-34 | **Printing** | 207-00 |
| Saving with | | **Stationery** | 3-80 |
| Cos. Co-op. | | **Postage & revenue** | |
| Bank in S. B. A-c. | | **stamps** | 74-80 |
| and F. D. | 5212-67 | **Other office expenses** | |
| **Subscriptions** | | (Including Payment of charges | |
| Ordinary members | 217-00 | for Office room) | 320-60 |
| | | **Annual Meeting** | 22-90 |
| | | **Transport, expenses** | 4-50 |
| Life members | 302-00 | **Audit Fee** | 25-00 |
| | | **Repairs, equipment** | |
| **Donation** | | **& furniture** | 25-00 |
| Earmarked for Bldg. | | Study circle and | |
| & Equipment Fund | 139-00 | Educational purpose | 200-90 |
| **Grant** | | Purchase of Nautical | |
| from Director of | | Almanac & Quarterly | |
| Education | 340-00 | Astronomical Magazine | 41-55 |
| **Sale** of books | 352-58 | **Closing balance** | |
| **Interest** | | Cash on hand | 80-59 |
| On Saving A-c | 470-45 | Savings in bank | 3100-40 |
| and Fixed deposit | | Fixed Deposit with | |
| Miscellaneous | 5-00 | Cos. co-op. Bank | 3000-00 |
| Total Rs. | 7255-04 | Total Rs. | :5-04 |

Examined & found correct — Sd. V. V. Sowani, Secretary
S-d for G. D. Apte & Co. — Y. R. Nene, treasurer
Chartered Accountants
5-8-1978

G. D. APTE & Co. Schedule VIII. Phone : 45892
Chartered Accountants vide Rule 17 (1) United Western Bank Bldg.
Registered No. F-44 Laxmi Road, Poona-2
Dated : 5 August 78

Name of the Public Trust :- Jyotirvidya Parisanstha, Poona

**Balance sheet as on 30 June 1978**

| Funds and Liabilities, | Rs. Ps. | Assets | Rs. Ps. |
|---|---|---|---|
| Trust Fund or Corpus | | | |
| as per last balance sheet | 1983-25 | Immovable Property | —— |
| Other funds | | Investment | —— |
| Research fund | | | |
| as per last B/S. | 5500-00 | Furniture & Fixtures | 220-86 |
| Life membership | | Library books | 829-98 |
| subscription as | | | |
| per last B/S | 1463-00 | Equipment | 3562-65 |
| Addition during | | Stock of Publications | 2087-16 |
| the year | 302-00 | Loans | —— |
| Building & equip. Fund | | Advances | —— |
| as per last B/S | 8364-00 | Income ontstanding | —— |
| | | Cash & Bank | |
| | | Balance | 3180-99 |
| | | F. D. with Cosmos | 3000-00 |
| | | Income & expenditure | |
| | | A/c as per last B/S | 4600-98 |
| | | Add deficit as | |
| | | per I/E Ac. | 129-63 |
| Total | Rs. 17,612-25 | Total | Rs. 17612-25 |

Sd. for G. D. Apte & Co
Chartered Accountant

सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, नक्षत्रे, धूमकेतू इत्यादींची समग्र माहिती पुरविणारी

# ज्योतिर्विद्या परिसंस्थेचीं प्रकाशनें

उपयुक्त व संग्राह्य

(१) **सूर्यकुल**– प्रथमावृत्ती संपली आहे.

(२) **तारकानगरी**– तारकांनी व्यापलेल्या एकंदर विश्वाविषयी उद्‌बोधक माहिती, तारकादिकांची ओळख, आकाशगंगेचे स्वरूप, दूर अंतरावरच्या ताऱ्यांची माहिती कशी मिळविली जाते, ताऱ्यांच्या गती कशा काढतात, अंतराळातल्या अनेक विश्वांचे स्वरूप इ. उपयुक्त व मनोरंजक माहिती. या प्रकाशनाला डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीने पारितोषिक देऊन गौरविले आहे व विद्वानांनी प्रशंसिले आहे. पृष्ठसंख्या १६५, किंमत रु ८–००

(३) **ताराचित्रक संच**– (आवृत्ती दुसरी, दोन रंगात छपाई) ठळक ठळक ताऱ्यांची ओळख करून देणारे, आकाशाच्या देखाव्यावरून तारीख व वेळ सांगणारे, तसेच तारीख, वेळेवरून आकाशाचे कोणते दृश्य दिसू शकेल त्याचा बोध करणारे दोन मोठे नकाशे. आकार: अनुक्रमे ४X३० व २७X२२॥ इंच. सोबत खुलासा विवरण पुस्तिकाही मिळते. सर्व संचाची किंमत रु. ५–००.

(४) **वेधसाधने व वेधशाळा**– प्राचीन काळापासून वेध घेण्याची साधने कोणती होती, त्यांची वाढ व परिणती पुढे कशी झाली, त्यांची रचना, वेधशाळाचे सामान्य स्वरूप व तेथील कार्य संवहज्योतिषक (Radio Astronomy) या विषयांची माहिती या ग्रंथात सुबोध रीतीने दिली आहे. कि. रु. ७–००

(५) **चंद्रप्रभा**– चंद्राचे वाङ्‌मयातील उल्लेख, चंद्रामुळे पं ांग कसे बनते, चंद्रावर वसाहत करणे कितपत शक्य आहे, चंद्राची ग्रहणे, भरती, आहोटी वगैरे-संबंधाने खुलासा व चटकदार वर्णन. डे व्हर्नी. ट्रान्सलेशन सोसायटीने पारितोषिक देऊन गौरविलेले पुस्तक. पृष्ठसंख्या १३०, किंमत रु. ६–००

---

प्रकाशक: वि. वि. सोवनी, कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था, ७२१।१।१०, प्रशांतनगर, नवी पेठ, पुणे ३०.
मुद्रक : म. बा. जोशी, ज्ञानविलास प्रेस, २७, बुधवार पुणे २.

## ज्योतिर्विद्या परिसंस्था, पुणे १९७८–७९ (शके १९०० ते १९०१) चा निकल्प. (अंदाजपत्रक)

| आय | रु. पै | व्यय | रु. पै. |
|---|---|---|---|
| (१) सामान्य सदस्य वर्गणी | २५०–०० | (१) सहाय्यक वेतन | १५०–०० |
| (२) देणग्या-शासकीय | ३५०–०० | (२) कचेरी खर्च | १५०–०० |
| महानगरपालिका | २००–०० | (४) सामान दुरुस्ती | १५०–०० |
| इतर | १००–०० | (४) वाहन खर्च | ३०–०० |
| (३) व्याज | ५००–०० | (५) जागा देखभाल | ३००–०० |
| (४) आजीव सदस्य शुल्क | २००–०० | (६) अहवाल, पत्रिका व इतर मुद्रण | ४५०–०० |
| (५) प्रकाशन विक्री | १००–०० | (७) वार्षिक सभा | ५०–०० |
| (६) किरकोळ | १०–०० | (८) ऑडिट फी | २५–०० |
| | १७१०–०० | (९) टपाल हशील | १५०–०० |
| अपेक्षित तूट | १३४५–०० | (१०) ग्रंथसंग्रह | २५०–०० |
| | | (११) स्फुट व्याख्याने, चित्रपट, अभ्यास मंडळ इ. | ३५०–०० |
| | | (१२) कायम निधी | ५००–०० |
| | | (१३) ताराचित्रक सुधारीत आवृत्ती | ५००–०० |
| एकूण रु. ३०५५–०० | | एकूण रु. ३०५५–०० | |

Sd. V. V. Sowani, Secretary Y. R. Nene, Treasurer

BOOK-POST

कार्यवाह, ज्योतिर्विद्या परिसंस्था,
लो. टिळक स्मारक मंदिर,
टिळक रोड, पुणें.